N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** विवेकानंद चौक पोलीस स्टेशन
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0615 **Year (वर्ष):** 2023
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/10/2023 05:12

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** गुरूवार
      **Time Period (कालावधी):** प्रहर 6
      **Date From (दिनांक पासून):** 12/10/2023
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/10/2023
      **Time From (वेळेपासून):** 17:42 वाजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 17:42 वाजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
      **Date (दिनांक ):** 13/10/2023 **Time (वेळ):** 04:56 वाजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
      **Entry No. (नोंद क्र.):** 007
      **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/10/2023 04:55 वाजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1. (a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
      पूर्व, 03 किमी **Beat No. (बिट क्र.):**
      (b) **Address (पत्ता):** RTO कार्यालय लातूर

      (c) **In case, outside the limit of this Police Station, then**
      (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
      **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
      **District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): जगदीश शिवाजी स्वामी

(b) **Father's/Husband's Name** (वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1970

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.** (पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | सच्चिदानंदनगर,लातुर,विवेकानंद चौक पोलीस स्टेशन,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | सच्चिदानंदनगर,लातुर,विवेकानंद चौक पोलीस स्टेशन,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विजय चिंतामन भोरे | | | 1. साईधाम सोसायटी लातूर, विवेकानंद चौक पोलीस स्टेशन, लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | प्रमोद उत्तमराव सोनसाळी | | | 1. साईसरस्वती अपार्टमेंट,सरस्वती कॉलनी लातूर,विवेकानंद चौक पोलीस स्टेशन,लातूर,महाराष्ट्र, भारत |
| 3 | जिलानी मेहबुब शेख | | | 1. इंडीया नगर,अमन कालनी लातूर,विवेकानंद चौक पोलीस |



Scanned with CamScanner

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 13/10/2023

मी श्री जगदीश शिवाजी स्वामी वय-53 वर्षे धंदा- नोकरी, रा.सच्चिदानंदनगर,लातुर जि.लातुर मो.न 9922203000.

मी वरील प्रमाणे असुन वरील ठिकाणी परिवारासह राहणेस आहे, मी महावितरण विभागामध्ये नोकरी करीत असुन माझी पत्नी सौ.स्वाती हीचा नर्मदा ट्रॅव्हल्स नावाने लातुर येथे व्यावसाय आहे. तसेच माझा मेव्हणा नरेंद्र स्वामी यांच्या देखील काही ट्रव्हल्स नर्मदा ट्रव्हल्स च्या नावाने सुरु आहेत, त्या व्यावसायात मी नेहमी आर.टी.ओ कार्यालयातील कामे करुन त्यांना मदत करीत असतो.

नर्मदा ट्रव्हल्स डेली सर्व्हीसेस सोबतच आम्ही शाळेच्या सहलीचा पण व्यवसाय करतो,तो व्यावसाय सिजनेबल असल्याने आम्ही ठरावीक काळासाठी त्या बसेसचा वापर करतो. सहली बंद च्या काळात आम्ही बस बंद ठेवतो. त्याकाळात आम्ही आर.टी.ओ कार्यालयातुन "ना वापर" बद्दल त्यांना ऑनलाईन कळवितो. त्यामुळे त्याकाळातील आमचे टॅक्सचे पैसे वाचतात.

माझे मेव्हणे श्री नरेंद्र स्वामी यांचे नावे असलेली बस क्र. एम.एच. 20 डीडी.3099 या बस बाबत मी नियमानुसार 'ना वापर' करणेबाबतचा अर्ज दि. 26/06/2023 रोजी ऑनलाईन दाखल अर्ज केला होता. नमुद बस ही वापरात नसुन नियमाप्रमाणे टॅक्स ची मुदत वाढविणे साठी मी दि. 10/10/2023 रोजी उप-प्रादेशीक परिवहन अधिकारी लातुर श्री विजय भोये यांचेकडे माझे मेव्हणे नरेंद्र यांचा अर्ज घेऊन गेलो असता त्यांनी मला तीन महिन्याचा टॅक्स वाढवुन देण्यासाठी माझ्याकडे 5000/- रु ची लाचेची मागणी केली.

म्हणुन मी दि.10/10/2023 रोजी अँटी करप्शन ब्युरो पुणे येथील पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे साहेब यांना संपर्क करुन माझे वरील तक्रारीबाबत माहीती दिली. त्यांचेसुचनेप्रमाणे मी दि. 11/10/2023 रोजी पुणे अँटी करप्शन ब्युरो येथे जाऊन पोलीस निरीक्षक श्री श्रीराम शिंदे साहेब यांची भेट घेऊन माझी वर नमुद तक्रार त्यांचेकडे लेखी स्वरुपात दिली ती पुढील प्रमाणे- 'वरील पत्त्यावर अनुसरुन आपणास तक्रार करण्यात येते की , माझी पत्नी सौ स्वाती जगदीश हिचा नर्मदा ट्रॅव्हल्स नावाने लातूर येथे व्यवसाय असून त्या व्यवसायासाठी मी नेहमी अडीअडचणीसाठी मदत करत असतो. उपप्रादेशिककार्यालयातील सर्व कामे ती स्त्री असल्याने मर्यादा येतात म्हणून ती सर्व कामे मीच करत असतो.नर्मदा ग्रुप मध्ये माझ्या पत्नीच्या नावाने काही बसेस आहेत, तसेच माझे मेव्हणे श्री नरेंद्र यांचे व इतर काही जणांचे ट्रॅव्हल्स बसेस नर्मदा ब्रँडखाली महाराष्ट्रातील काही जिल्ह्यामध्ये डेली सर्व्हिस साठी चालत असतात. त्या सर्व बसेस ची देखभाल चालक क्लिनर इत्यादी कामे मी पाहत असतो. नर्मदा ट्रॅव्हल्स डेली सर्व्हिस सोबतच आम्ही शाळेच्या सहली चा पण व्यवसाय करतो.सहलीचा व्यवसाय हा सिझनेबल असल्याने आम्ही ठराविक काळासाठी त्या बसेस चा वापर करतो. सहली बंद असलेल्या काळामध्ये आम्ही बसेस बंद ठेवतो ,त्या काळामध्ये आम्ही उपप्रादेशिककार्यालया मध्ये 'ना वापर' बद्दल ऑनलाईन कळवतो त्यामुळे आमचे टॅक्सचे पैसे वाचतात. अशाच प्रकारे माझे मेव्हणे श्री नरेंद्र स्वामी यांचे नावे असलेली बस क्र एम एच 20 डीडी 3099 ही बस मी नियमाप्रमाणे



Scanned with CamScanner

ऑनलाईन दिनांक 26/6/23 रोजी 'ना वापर' करणेबाबतचा अर्ज दाखल केला होता.
सदरची बस क्र एम 20 डब्ल्यू 3099 ही वापरात आणून नियमा प्रमाणे ड्रायव्हर ची मुदत वाढवणे साठी मी दि. 10/10/2023 रोजी उप प्रादेशिक परीवहन अधिकारी लातूर श्री विजय भोये यांचेकडे माझे मेव्हणे नरेंद्र स्वामी यांचा अर्ज घेऊन गेलो असता त्यांनी मला तीन महिन्याचा ड्रायव्हर वाढवुन देण्यासाठी 5000/-रू लाचेची मागणी केली व ते पैसे त्यांच्याच ऑफीस मधील आऊट सोर्स कर्मचारी श्री जिलानी यांचेकडे देण्यास सांगितले. जिलानी हे श्री विजय भोये साहेब यांचे रोज अशा मार्गाने येणाऱ्या पैशाच्या नोंदी सांकेतिक भाषेत वही मध्ये नोंद करत असतात. श्री विजय भोये साहेबांनी पैसे दिल्याशिवाय तुमचे काम होणार नाही असे स्पष्ट सांगितले. श्री विजय भोये साहेब उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी लातूर यांच्या मागणी प्रमाणे मी पैसे दिले नाही तर ते माझे मेव्हणे नरेंद्र स्वामी यांचे नावे असलेली बस क्र एम 20 डब्ल्यू 3099 या बसचा तीन महिने ड्रायव्हर वाढवून देणार नाहीत. मला त्यांना पैसे देण्याची अजिबात इच्छा नाही तरी मी दोन दिवसात माझे कामासाठी त्यांचेकडे जाणार आहे तडजोडीमध्ये काही रक्कम कमी होते का याबाबत बोलणी करणार आहे.संबंधित उपप्रादेशिक परीवहन अधिकारी श्री विजय भोये यांचे सोबत माझी कसल्याही प्रकारची वैयक्तिक दुष्मनी नाही किंवा त्यांचा माझा वर नमूद प्रमाणे देणे घेण्याचा कुठल्याही प्रकारचा व्यवहार नाही. तरी उप-प्रादेशिक परीवहन अधिकारी लातूर श्री विजय भोये यांनी वर नमूद कामासाठी मला पैशाची मागणी करून सदर रक्कम स्वतः अगर इतरा मार्फत स्विकारल्यास त्यांना पकडून त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी ही नम्र विनंती'. अशा आशयाची तक्रार दिली. मी भोये यांना भेटण्यासाठी दि. 12/10/2023 रोजी जाणार असल्याचे सांगितले.
दि.12/10/2023 रोजी पो.नि.शिंदे हे मला लातूर येथे येऊन सकाळ मला भेटले. पोलीस निरीक्षक शिंदे साहेब यांनी त्यांचेसोबत उपलब्ध असलेल्या शासकीय पंचाची व सोबतच्या स्टाफची माझ्याशी ओळख करुन दिली. तसेच शिंदे साहेबांनी पडताळणी कारवाईबाबत व व्हाईस रेकॉर्डरबाबत मला माहीती दिली. माझ्या तक्रारीचे पडताळणी करण्यासाठी माझे सोबत व्हाईस रेकॉर्डर देवून शासकीय पंच श्री. सुधाकर ज्ञानेश्वर मगर यांचेसह मला श्री.विजय भोये यांना भेटण्यासाठी उप प्रादेशीक परिवहन कार्यालय लातुर येथे दुपारी 12.30 वा.सुमारास पाठविले. तेथे गेल्यानंतर माझी व श्री भोये यांची भेट होऊन माझ्या कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी चर्चे दरम्यान श्री. भोये यांनी माझ्याकडे माझे मेव्हणे यांची वर नमुद "ना वापर" प्रकारातील ट्रॅव्हल्स 'वापर' या प्रकारात आणुन देणेसाठी व त्यावरचा टॅक्स आकारण्यासाठी सुरुवातीस 05,000/-(पाच हजार) रुपयाची मागणी करुन तडजोडी अंती 03,000/- (तीन हजार) रुपयांची मागणी करुन ती लाच रक्कम त्यांचे कर्मचारी श्री प्रमोद सोनसाळी यांचे करवी घेण्याचे मान्य केले. ती रक्कम तात्काळ घेऊन येण्यास सांगितले. म्हणुन आम्ही सुप्री हॉटेल,बाभुळगाव रोड येथे शिंदे साहेब व पथक थांबले तेथे निघुन आलो. श्री.भोये यांनी 03,000/- रु लाच रक्कम घेऊन बोलाविले असल्याने त्याप्रमाणे मी माझ्या बचतीतील सोबत घेऊन आणलेली रक्कम 03,000/- (तीन हजार) रुपये रक्कम त्यात 500/-रु दराच्या 6 नोटा शिंदे साहेब यांच्याकडे दिल्या. त्या रक्कमेला अँथ्रासीन पावडर लावून ती रक्कम माझ्याकडे परत दिली. शिंदे साहेब यांनी मला पुढील कारवाईच्या अनुषंगाने योग्यत्या सुचना दिल्या. माझ्यासोबत व्हॉईस रेकॉर्डर आणि पंच यांना सोबत देवून मला श्री.सोनसाळी यांना भेटण्यासाठी उप-प्रादेशीक परिवहन कार्यालय लातुर येथील कार्यालयात पाठविले. आम्ही श्री सोनसाळी यांना भेटण्यासाठी उप-प्रादेशिक परिवहन कार्यालयात गेलो असता मला तेथे खाजगी एजंट जिलानी शेख भेटले. माझे पाठोपाठ शिंदे साहेब व त्यांच्या पथकाचे लोक नमुद कार्यालयाच्या आवारात थांबुन राहिले. मी व पंच श्री मगर यांनी कार्यालयाच्या आवारात जाऊन प्रथम खाजगी एजंट जिलानी शेख व त्यानंतर क्लार्क श्री प्रमोद सोनसाळी यांची यांची भेट घेतली व सांगितले की, "भोये साहेबांनी तुमच्या कडे 03,000/- रु देण्यास सांगितले प्रमाणे मी तीन हजार रुपये घेऊन आलो आहे." त्यानंतर श्री.जिलानी शेख यांनी ते पैसे साहेबांनी सोनसाळी यांचेकडे देण्याचे सांगितले आहे. तुम्ही ते पैसे सोनसाळी यांचेकडे द्या असे बोलुन मला लाच रक्कम सोनसाळी यांचेकडे देण्यासाठी प्रोत्साहन दिले.त्यानंतर मी श्री सोनसाळी यांना जाऊन भेटलो व भोये साहेबांनी तुमच्याकडे 03,000/- रु देण्याचे सांगितले आहे असे बोललो. त्यानंतर ती रक्कम माझ्याकडुन स्विकारुन सोनसाळी यांनी त्यांच्या पँटच्या खिशात ठेवल्यानंतर मी पुन्हा भोये साहेबांना भेटुन ठरल्याप्रमाणे 03,000/-रु श्री.सोनसाळी यांचकडे दिल्याचे सांगितले व सापळा पथकास माझ्या खिशातील चष्मा डोळ्यावर लावुन लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. सापळा पथकाने लगेचच श्री.भोये, जिलानी व सोनसाळी यांना दि. 12/10/2023 रोजी 17.42 वाजताच्या सुमारास उप-प्रादेशिक परिवहन विभाग येथे ताब्यात घेतले. शिंदे साहेब यांनी नमुद तिघांना ही त्यांचे नाव, पत्ता, पद विचारले.
तरी तक्रारदार यांना "ना वापर" प्रकारातील ट्रॅव्हल्स 'वापर' प्रकारात आणुन देणेसाठी व त्यावरचा परिवहन टॅक्स आकारण्यासाठी सुरुवातीस 05,000/-रु व तडजोडी अंती 03,000/- रु लाच रक्कम श्री.भोये यांनी पंचा समक्ष मागणी करुन ती लाच रक्कम क्लार्क सोनसाळी यांचे करवी उप-प्रादेशिक परिवहन कार्यालय लातुर येथे स्विकारली.



Scanned with CamScanner

तसेच लाच रक्कम मी सोमसाळी यांना द्यावी या करीता खाजगी एजंट गिलानी शेख यांनी मला प्रोत्साहन दिले म्हणुन माझी त्याचे विरुध्द फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद मी वाचून पाहीली असुन माझे सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याने.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिकाऱ्याचे नाव):
bhagwat dnyandeo funde
**Rank** (पद): Dy. SP (Deputy Superintendant **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठविल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Sudhakar murlidhar
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DCPS13701000362SMB



Scanned with CamScanner